## रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

आणि

## सावरकर दर्शन प्रतिष्ठान

संयुक्त विद्यमाने

# स्वा. सावरकर स्मृती
# आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा – २००९

## अहवाल

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि सावरकर दर्शन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित **स्वा. सावरकर स्मृती आंतर महाविद्यालयीन स्पर्धा, दि. ७ नोव्हेंबर, २००९** रोजी प्रबोधिनीच्या ज्ञान – नैपुण्य केंद्र, केशव सृष्टी, उत्तन येथे स्पर्धा संपन्न झाली.

**"दहशतवादाच्या मुकाबल्यासाठी लष्करी शिक्षण अनिवार्य करण्याची गरज आहे?"** हा स्पर्धेचा विषय होता. या स्पर्धेत महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, ठाणे, जळगाव व धुळे विभागातून १३ महाविद्यालयांचे २८स्पर्धक सहभागी झाले होते, यामध्ये १३ संघ होते तर दोन स्पर्धक खुल्या गटातील होते.

या स्पर्धेला दूरदर्शनच्या निवृत्त निर्मात्या व सूत्रसंचालिका **श्रीमती विजया जोगळेकर – धुमाळे** उद्घाटक तसेच परीक्षक म्हणून उपस्थित होत्या. महाराष्ट्र टाईम्सचे ज्येष्ठ पत्रकार व संरक्षण विषयाचे अभ्यासक **श्री. दिवाकर देशपांडे** तसेच साम मराठी वाहिनीचे तरुण पत्रकार व वृत्त निवेदक **श्री. सागर गोखले** परीक्षक म्हणून उपस्थित होते.प्रबोधिनीचे विश्वस्त श्री. अरविंद रेगे व प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री. विनोद पवार आदी मान्यवरही उपस्थित होते. या प्रसंगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक व सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष श्री. रवींद्र साठे यांनी प्रास्ताविक केले, दीपप्रज्वलनाने स्पर्धेचे उद्घाटन झाले.

या स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक मिळून सहा पुरस्कार देण्यात आले. **सांघिक विजेतेपद धुळे येथील झेड.बी. पाटील महाविद्यालयास मिळाले.** आशिष कुटे व गोकुळ लहासे हे दोन विद्यार्थी या विद्यालयातर्फे सहभागी झाले होते,त्यांना पुरस्कारात सावरकराचे दोन ग्रंथ (जोसेफ मॅझिनी, माझी जन्मठेप), स्मृतिचिन्ह, सावरकर चित्रपट व्ही. सी.डी. तसेच प्रमाणपत्र देण्यात आले.

**सांघिक उपविजेतेपद भरत पाटील व योगेश परळे या संज्ञापन व वृत्तपत्र विभाग, पुणे विद्यापीठाच्या जोडीने मिळविले.** त्यांना सावरकरांचे दोन ग्रंथ (हिंदुत्व, शत्रुच्या शिबिरात) स्मृतिचिन्ह, सावरकर चित्रपट व्ही. सी.डी. तसेच प्रमाणपत्र ही देण्यात आले.

**वैयक्तिक पुरस्कारांतील प्रथम पुरस्कार गौरी नाईक जी. एस. मेडिकल महाविद्यालय, मुंबई हिने मिळविला,** यामध्ये स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, सावरकर चित्रपट व्ही.सी.डी. सावरकरांचे दोन ग्रंथ माझी जन्मठेप, हिंदुत्व आणि रुपये २५०१ /- हे देण्यात आले. द्वितीय पुरस्कार स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र, सावरकर चित्रपट व्ही.सी.डी. सावरकरांचे दोन ग्रंथ माझी जन्मठेप, हिंदुत्व आणि रु. २००१/- संकेत जोशी शासकीय अभियांत्रिकी विद्यालय, पुणे याने मिळविला. तृतीय पुरस्कार स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व सावरकर चित्रपट व्ही.सी.डी., सावरकराचे दोन ग्रंथ हिंदुपदपादशाही , हिंदुत्व आणि रु. १५०१/-हे मुंबईतील साठ्ये महाविद्यालयातील दीप काकडे याने प्राप्त केले. उत्तेजनार्थ पुरस्कार आशिष कुटे झेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे याने मिळविला.

स्पर्धेच्या समारोप प्रसंगी 'ग्रंथाली' चळवळीचे संस्थापक सदस्य व सक्रीय कार्यकर्ते **श्री. दिनकर गांगल** उपस्थित होते. यांच्या हस्ते पुरस्कार विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. यावेळी बोलतांना श्री. गांगल यांनी २६/११ च्यावेळी त्यांची मनःस्थिती सांगितली तसेच स्पर्धकांना मार्गदर्शन केले. प्रबोधिनीचे महासंचालक डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी अशा स्पर्धांना मिळणाऱ्या कोमट प्रतिसादाबद्दल खंत व्यक्त केली तसेच आलेल्या स्पर्धकांचे अभिनंदन करुन प्रोत्साहन दिले. या वेळी श्री. दिवाकर देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना एकंदरच या विषयाचा व्यापक अभ्यास कसा करावा? या बद्दल मार्गदर्शन केले. श्रीमती विजया जोगळेकर-धुमाळे यांनी विद्यार्थ्यांना वक्तृत्वातील उच्चारण, देहबोली, उदाहरणांचा अभ्यास याबद्दल थोडक्यात मार्गदर्शन केले. यावेळी सावरकर दर्शन प्रतिष्ठानच्या कार्यवाह श्रीमती चित्रा फडके याही उपस्थित होत्या.

स्पर्धेतील सहभागींच्या अभिप्रायानुसार स्पर्धेचा कालावधी अनुकूल असून विषय सध्याच्या परिस्थितीवर आधारीत आहे असे सांगण्यात आले.

*******